DR. BABASAHEB AMBEDKAR
MARATHWADA UNIVERSITY,
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR.
**DEPARTMENT OF SPORTS**
Office of the Sports Directorate
Department of Sports, University Campus,
Chhaptrapati Sambhajinagar-431004,
Maharashtra (India)
Office Telephone No.+919422412170
Website: www.bamu.ac.in
E-Mail: sports.section@bamu.ac.in

(NAAC 'A+' Grade)
(नॅक अ+ दर्जा प्राप्त)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
**क्रीडा विभाग,**
क्रीडा संचालनालय कार्यालय,
क्रीडा विभाग, विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर-४३१००४, महाराष्ट्र (भारत)
कार्यालय दुरध्वनी क्र. .+919422412170
वेबसाईट www.bamu.ac.in
ई-मेल sports.section@bamu.ac.in

Ref.No. Sports/वार्षिक नियोजन बेठक/2025-2026/ Date: 18.08.2025.

प्रति,
मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर.

विषय: विद्यापीठाच्या वार्षिक क्रीडा नियोजन बेठक व चर्चासत्राचे आयोजन दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता..

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली व मान्यतेनुसार विद्यापीठाच्या क्रीडा विभागाची वार्षिक क्रीडा नियोजन बैठक व चर्चा-सत्राचे दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य नाटयगृह, विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर, येथे आयोजन करण्यात आले आहे.

बैठकीत आगामी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळातर्फे तयार करण्यात आलेल्या आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांच्या व आंतर विभागीय स्पर्धा आयोजनासंदर्भात विद्यापीठ नियमावलींची माहिती देणे, विद्यापीठाचे विविध क्रीडा प्रकारांच्या संघांचा पश्चिम विभागीय / आंतर विभागीय / अखिल भारतीय आंतर- विद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०२५-२०२६ मध्ये अधिक भक्कमपणे सहभागी होण्यासंदर्भात चर्चा, व आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धाचे वाटप करणे ईत्यादीबाबत चर्चा व निर्णय घेण्यात येणार आहे.

तसेच बैठकीत सहभागी होणा-या संबधीत क्रीडा संचालक व क्रीडा प्राध्यापक यांना विद्यापीठामार्फत कुठल्याही प्रकारचा प्रवास भत्ता देय राहणार नाही. मात्र दिवशीची त्यांची सेवा विद्यापीठ नियमानुसार कर्तव्य-रजा (On Duty) ग्राहय धरण्यात येईल, विद्यापीठामार्फत त्यांच्या दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात येईल, व लांबून आलेल्या क्रीडा संचालक व प्राध्यापकांची राहण्याची व्यवस्था देखील करण्यात येईल. हजर व गैरहजर राहणा-या क्रीडा संचालक व क्रीडा प्राध्यापकांची नोंद ठेवण्यात येईल.

करिता, मा. प्राचार्यांना विनंती करण्यांत येते की, विद्यापीठाच्या दिनांक २६.८.२०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता होणा-या वार्षिक क्रीडा नियोजन बेठक व चर्चासत्रामध्ये सहभागी होण्यासाठी, आपल्या महाविद्यालयातील क्रीडा संचालक व शारीरिक शिक्षण विषयाचे क्रीडा प्राध्यापक यांना उपस्थित राहण्याबाबत सुचित करण्यात यावे, ही नम्र विनंती आहे.

आपला विश्वासु,
18/8/2025

प्र-संचालक,
विद्यापीठ क्रीडा विभाग.

I/C DIRECTOR
DEPT. OF SPORTS
Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University,
Chhatrapati Sambhajinagar

क्रमशः...२...

क्री.प्रा.प. ②

या पत्राची एक प्रत मा. कुलगुरु यांचे स्वीय सहायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

या पत्राची एक प्रत संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.

या पत्राची एक प्रत श्री संजय शिंदे, पी.आर.ओ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.

Scanned with AltaScanner